CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. ७ मार्च २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १५८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## शाहु महाराज मविआकडून लढणार

### ▸ संभाजीराजे छत्रपतींनी भाजपाविरोधात तलवार उपसली

✔ **सोलापूर** : कोल्हापूर मतदारसंघातून शाहू महाराज हे निवडणूक लढणार आहेत. ते महाविकास आघाडीकडूनच निवडणूक लढवतील, असे संभाजीराजे छत्रपती यांनी बुधवारी स्पष्ट केले.

शाहू महाराज आमच्यासाठी सर्वस्व आहेत. त्यांनी लोकसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे माझा लोकसभा लढण्याचा प्रश्नच येत नाही. स्वराज्य संघटना ही कुठेही लोकसभा निवडणुकीत लढणार नाही, असे सांगून संभाजीराजे छत्रपती यांनी लोकसभा निवडणुकीतून माघार घेत असल्याची घोषणा केली. गेल्या दीड वर्षांपासून संभाजीराजे लोकसभा निवडणुकीची तयारी करत होते. परंतु शाहू महाराजांच्या लोकसभा निवडणूक लढण्याच्या निर्णयाने त्यांनी आपली तलवार म्यान केली आहे. शाहू महाराजांचे वय विचारता मग मोदींचे वय किती आहे? असा सवाल विचारत भाजपविरोधातील मोर्चाही त्यांनी उघडला. कोल्हापूर हे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांवर चालते. पुरोगामी विचारांवर चालते. टोकाच्या विचारांना इथे थारा नाही, असे ठणकावून सांगत भाजपच्या हिंदुत्ववादी राजकारणाला शाहू महाराजांच्या रुपात पुरोगामी पर्याय असल्याचेही त्यांनी अप्रत्यक्ष सांगितले. छत्रपती संभाजीराजेंनी कोल्हापुरात पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली.



# बारामतीत साहेब; माढ्यात ताई?

## थोरल्या काकांचा नवा डाव

✔ मुंबई, सोलापूर/प्रतिनिधी

**वाचकहो, एक कुजबुज ऐकायला मिळतेय. खरं तर ही कुजबज कसली? राजकारणातील भयावह घडामोड म्हणता येईल ती. बातमी तशी खासच आहे. मात्र, सध्या तरी ती कोणी कन्फर्म करु शकत नसल्यानं ती देण्याचं धाडसं करणं अवघड आहे. शिवाय ती फारशी लोकांपर्यंत पोचलेली नाही. राजकारणातील जी घडामोड घडली, ती बाहेर येऊ नये, यासाठी खास प्रयत्न झाले त्यामुळेदेखील या बातमीपर्यंत कोणी पोचले नाही. पण जे काही घडलंय... जे घडवलंय गेलंय.. ते विचार करण्याच्या पलिकडंचं असावं. जे ठासून सांगता येत नाही, पण घडल्याची शक्यता आहे, त्याला पुष्टी मिळणारे तसे अनेक कंगोरे आहेत. महाराष्ट्राचं राजकारण मागच्या काही वर्षांपासून ज्या दिशेनं वाटचाल करु लागलं. ते चित्र आपल्या कल्पनेच्या पलिकडचं आहे. अकल्पनीय अन् अनाकलनीय आहे.**

## अनपेक्षित उमेदवारीचा भूकंप?

### ...तर शरद पवारांच्या पर्वाचा अंत

सुप्रिया सुळे-पवारांचा किंवा शरद पवारांचा पराभव बारामतीच्याच नव्हे, तर महाराष्ट्राच्या राजकारणातून शरद पवार पर्वाचा अंत ठरू शकतो. आज नव्वदीकडे वाटचाल करणाऱ्या शरद पवारांची राजकाणातून संन्यास घेण्याची मानसिकताच तयार होत नाही. राजकारण सोडण्याची त्यांची इच्छाच होत नाही. त्यांना जसं सुप्रियांना माढ्यातून जिंकून आणायचं आहे, तसंच त्यांना स्वत:साठी बारामतीमधून सेफ पॅसेज करुन घ्यायचा आहे. त्यासाठी भोजन डिप्लोमेसीच्या फंदात पडले असावेत. ते बारामतीत नाही जमलं. तसं तर ते जमलंचं नसतं. कारण अजित पवारांनी ते टाळलं असतं. मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस हे एकत्र असताना पवारांना आपली मनोव्यथा फडणवीस यांच्याकडे मांडता आली नसती. जे बारामतीत घडलं नाही. घडविता आलं नाही. ते परवा फडवीसांच्या सागर बंगल्यावर जाऊन बारामतीकर काकांनी घडविण्याचा प्रयत्न केल्याचा सुगाव लागतोय. निश्चित अद्याप स्पष्ट माहिती पुढे आलेली नाही. पण सागर बंगल्यावरची कमी केलेली गर्दी, तेथील लगबग, पोलीसांना दिलेल्या विशेष सुचना हे खूप काही सांगून जाणारं आहे. शरद पवार आणि सुप्रिया सुळे हे सागर बंगल्यावर गेल्याचं वृत्त आहे. तशी दाट शक्यता आहे.



राज्याच्या राजकारणातील भीष्मपितामह थोरले काका बारामतीकर म्हणजेच शरद पवार आणि त्यांच्या संसदरत्न कन्या सुप्रिया सुळे यांच्याबातमींमधील हे भन्नाट प्रकरण. प्रकरण कसले? आधारवड शरद पवार नावाच्या राज्याच्या राजकारणातील पर्वाचा अंत होऊ नये, यासाठी दस्तुरखुद्द स्वत: शरद पवार आणि त्यांच्या राजकिय वारसदार कन्या सुप्रिया सुळे यांनी पडद्याआडून टाकलेल्या सोंगट्या. ज्या सोंगट्यांमुळे बारामतीसह माढ्याच्या लोकसभा मतदार संघात उमेदवारींचा अनपेक्षित भूकंप होऊ शकतो. असाच तो 'रात्रीस खेळ चाले' पिता-कन्येच्या राजकारणाचा.

अमेठी पाडल्यानंतर रायबरेली आणि बारामती मतदार संघावर भाजपाने आपले विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. बारामतीची जागा ताब्यात घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भाजपाने हाताशी धरले आहे. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्या विजयासाठी अजित पवार गटाला पुरेपूर 'रसद' देण्याची रणनिती या पक्षाने आखली आहे. दरम्यान, सुनेत्रा पवार यांच्यासोबत लढताना सुप्रिया सुळे यांना पराभवाची धूळ चाखावी लागल्यास शरद पवारांचा उरलासुरला राष्ट्रवादी गट राहणार नाही. त्यामुळे खुद्द शरद पवार हेच स्वत: बारामतीच्या महासंग्रामात उतरण्याची शक्यता आहे. शरद पवार हे बारामतीमधून आखाड्यात उतरल्यास सुप्रिया सुळेंच्या खासदाकारींचे काय? या प्रश्नावर तोडगा शरद पवार यांच्याकडून काढला जात असल्याचा बोलबाला आहे.

सुप्रिया सुळे यांना माढ्यातून निवडणुकीला उभे करण्याचा घाट घातला जात आहे. बारामतीचा गड स्वत: राखण्यासह माढ्यातून कन्या विजयी झाल्यास आपल्या राष्ट्रवादी पर्वाचा अंत होणार नाही, असे मानून शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी उमेदवारींसंबंधी वेगळ्या हालचाली चालविल्या आहेत. परवा शरद पवार आणि सुप्रिया सुळे हे दोघेच आपल्या अत्यंत विश्वासामधील वाहन चालकास सोबत घेऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर गेले होते, तिथे त्यांनी भोजन डिप्लोमेसी केल्याची कुजबुज आहे. वास्तविक या घडामोडीला अद्याप दुजोरा मिळत नसला तरी जाळ होता म्हणून धूर निघाल्याचा तर्क व्यक्त केला जात आहे. ज्यादरम्यान शरद पवार सुप्रिया सुळे हे सागर बंगल्यावर फडणवीस यांना भेटायला जाण्यादरम्यान येथील गर्दीपूर्णपणे पांगविण्यात आली होती. काही ठराविकजणांनाच येथे थांबू दिले होते. शिवाय पोलीसांना विशेष सूचना दिलेल्या होत्या. त्यावरुन काही तरी निश्चित वेगळे घडल्याचे दिसते.

एकदा का उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवीस यांचा ग्रीन सिग्गल मिळाला की बारामती कुणी लढवायची? हे ठरविता येईल, या दृष्टीने शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी फडणवीस यांची भेट घेतली असावी. बारामती आणि माढ्यातून लढण्याचा काही वेगळा निर्णय समोर आल्यास पवार पिता- कन्या फडणवीस यांना भेटले होते आणि राजकारणात कधीही आणि काहीही घडू शकते, हे अधोरेखीत होऊन जाईल. शरद पवार यांनी बारामती आणि माढ्यासाठी भोजन डिप्लोमेसी डाव टाकला, जो बारामतीत यशस्वी झाला नाही. फडणवीस यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बारामतीतील भोजन टाळले. पण पुढचे पाऊल म्हणून पवार यांनी सुप्रिया यांना घेऊन सागर बंगल्यावर फडणवीसांकडे भोजन डिप्लोमशीचा प्रयोग यशस्वी करण्याची चाल खेळली असावी, अशी कुजबुज आहे. लोकसभेच्या उमेदवारीत प्रचंड मोठ्या घडामोडी घडत आहेत. बारामती आणि माढा येथील निर्णय बदलल्यास महाराष्ट्राच्या राजकारणावर खूप वेगळे परिणाम दिसल्यास नवल वाटू नये. बारामतीत सुप्रिया सुळे उभ्या ठाकतील, असे मानून शरद पवार गटाने काम सुरु केले आहे. अद्याप माढ्याचा निर्णय शरद पवारांनी घेतलेला नाही. महादेव जानकरांसंबंधी गुगली टाकली आहे.

## दैवेंद्रभाऊ; येऊ का जेवायला?

### शरद पवारांची प्रतिष्ठा अधिक पणाला

बारामती लोकसभा पवारांच्या प्रतिष्ठेचा विषय बनला आहे हे लक्षात घ्यायला हवं.यात जसे शरद गोविंदराव पवार येतात, सुप्रिया सुळे येतात तसेच अजित अनंतराव पवारही येतात. अजित पवारांनी त्यांच्या सौभाग्यवती सुनेत्रा पवार यांचे नाव लोकसभेसाठी घोषित केले असेल तर सुनेत्रा पवारांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न. मात्र सगळ्या पवारांमध्ये शरद पवारांची प्रतिष्ठापणाला लागणे जास्त औत्सुक्याचं आणि महाराष्ट्राच्या राजकारणावर परिणाम करणारे ठरणारं आहे.

### कोपराला गुळ लावलेल्या जानकरांचे काय?



बारामतीनंतर हक्काचा मतदार संघ म्हणून शरद पवार हे माढ्याचे नाव घेतात. स्वत:च्या पर्वाचा अंत रोखण्यासाठी जर का कन्या सुप्रिया यांना माढ्याच्या महासंग्रमात पाठविण्याचा निर्णय शरद पवार घेणार असतील तर रासपच्या महादेव जानकर यांचे काय? कारण माढ्याची जागा रासपला सोडण्याची तयारी खुद्द शरद पवारांनी दाखविली. त्यातून माढ्याच्या उमेदवारीचा गुळ महादेव जानकर यांच्या कोपराला लावला.अशात जानकरांचा तिढा बारामतीकर काका कसा सोडविणार, हे पाहणेदेखील अत्यंत औत्सुक्याचे ठरणारे आहे.

### माढ्याची निवडणुकीची गणितं ठरविणार काळ

शरद पवार यांनी माढा लोकसभेतून निवडणूक लढविली. तेव्हांपासून हा मतदार संघात देशाच्या राजकीय पटलावर चर्चेत राहिला. २०१९ च्या येथील लोकसभेच्या निवडणुकीतसुध्दा शरद पवार यांचे या मतदार संघावर खास लक्ष होते. शरद पवावर विरुद्ध देवेंद्र फडणवीस अशी नेतृत्वाची झलक यावेळी बघायला मिळाली. मात्र, फडणवीसांच्या रणनितीचा विजय झाला. या खेपेच्या निवडणुकीवरदेखील फडवीस यांचे लक्ष आहे. अशातच आता सुप्रिया सुळे यांचे नाव समोर येत असल्याने माढ्यातील निवडणुकीची गणित वेगळी होऊ शकतात. राजकारण हे जर-तर चे असते. नेमके काय होणार? याचे उत्तर येणाऱ्या काळाकडे असेल.



### सुप्रियांच्या व्हायरल व्हिडीओवरुन वातावरण बदलाचे चित्र

सुनेत्रा पवार यांना 'फाईट टू फाईट' लढत देण्यासाठी सज्ञ झालेल्या सुप्रिया सुळे संपर्क वाढविला आहे. या पार्श्वभूमीवर, बारामती मतदार संघातील राष्ट्रवादीचा एका पदाधिकाऱ्यास त्यांनी फोन लावून तुतारी पोचली का? माझे काम सुरु केले का? असे विचारले. त्यावर संबंधित पदाधिकाऱ्यांनी आम्ही वहिनींचे (सुनेत्रा पवार) यांचे काम सुरु केल्याचे सांगितले. हा व्हिडीओ बारामती मतदार संघात प्रचंड व्हायरल करण्यात आला आहे. त्यावरुन वातावरण फिरत असल्याचे लक्षात घेत सुप्रिया सुळे यांना माढ्याच्या सुरक्षीत मतदार संघातून निवडून आणण्याचा होरा खुद्द शरद पवार यांचा असावा अशी कुजबुज बारामतीत आहे.

## मराठा आंदोलकांचा आदर करत; प्रणिती शिंदे कार्यक्रम टाळून परतल्या

✔ **पंढरपूर** : मराठा आंदोलकांच्या तीव्र रोषाला लोकप्रतिनिधींना सामोरे जावे लागत आहे. मराठा आरक्षण आंदोलकांचा फटका आ. प्रणिती शिंदे यांना बसला. पाटखळ येथून त्यांना कार्यक्रम न घेताच परतावे लागले.

येत्या काही दिवसात होणाऱ्या लोकसभा निवडणुकिच्या अनुषंगाने मंगळवेढा तालुक्यातील गाव भेट दौऱ्यावर आलेल्या लोकसभेच्या काँग्रेसच्या इच्छुक उमेदवार आ.प्रणिती शिंदे (पान ७ वर)

## मराठा आरक्षणा विरोधात उद्या सुनावणी

✔ **मुंबई** : मराठा आरक्षणाविरोधात डॉ. जयश्री पाटील यांनी मुंबई हायकोर्टात दाखल केलेल्या याचिकेवर शुक्रवारी सुनावणी आहे. ॲड. सदावर्ते यांच्या पत्नी जयश्री पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयात मराठा आरक्षणाला आव्हान दिलं होतं. (पान ७ वर)

## विणकर फेडरेशनमध्ये तब्बल २४ कोटी रुपयांचा अपहार

### अविनाश बोमड्याल यांच्यासह १४ आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : जिल्हा विणकर सहकारी फेडरेशन संस्थेत २४कोटी ३३ लाख ८६हजार रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी चेअरमन अविनाश प्रकाश बोमड्याल (रा. सोलापूर) यांच्यासह १४ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. प्रथम विशेष लेखापरिक्षक (वर्ग-२) बप्पाजी छबुराव पवार यांनी या आरोपींविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, सोलापूर जिल्हा विणकर सहकारी फेडरेशन नियमित, डी-२४ ते ३१, भद्रावती (पान ७ वर)

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



'सोशल मिडीया' पुन्हा सुरळीत झाला !

कल्याण
120-37-467

मुंबई
237-20-280

# भाजपा चारशे पार, राष्ट्रवादीला केवळ चार

## महायुतीतील जागावाटपात शहा यांच्याकडून दबावतंत्र

- निवडून येण्याची एकमेव अट टाकल्याने पवार, शिंदे निरूत्तर
- पक्षांतर केलेल्या खासदारांच्या अनेक जागांवर भाजपाचा दावा

✔ सुराज्य/मुंबई

**ज्या पक्षाचा विजयी उमेदवार जिथे आहे, तेथे त्या पक्षाला उमेदवारी देण्याचा निर्णय बाजूला ठेवत भातीय जनता पक्ष एकटाच ३२ जागा लढवण्याचा निर्णय अमित शहा यांनी अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या गळी उतरवला आहे. त्यामुळे राष्ट्रवादीचे सुनील तटकरे, शिवसेनेचे श्रीरंग बारणे यांची उमेदवारी धोक्यात आली आहे. शिंदेसेनेने रत्नागिरी मतदार संघावर सांगितलेला हक्क त्यांना सोडावा लागणार आहे. संभाजीनगरातूनही भाजपाच उमेदवार देणार असल्याचे स्पष्ट होत आहे. दरम्यान माढा मतदार संगावर हक्क सांगून त्या बदल्यात रायगडची जागा सोडवून घेण्याच्या अजित पवार गटाच्या दाव्याला त्यामुळे खो बसला आहे.**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्याशी बंद दाराआड चर्चा केली. त्यांनी पक्षाकडून केलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल समोर ठेवून विजयी होण्याची शक्यता या एकाच निकषावर लोकसभा निवडणुकित जागावाटप होईल. त्यामुसार शिवसेनेला ९ तर राष्ट्रवादी अजित पवार गटाला चार जागा सोडण्याची तयारी असल्याचे स्पष्ट केल्याचे सूत्रांनी सांगितले. महायुतीच्या जागावाटपाच्या चर्चेत शिंदे गट १२ ते १३ आणि अजित पवार गट ६ ते १० जागांच्या मागणीवर ठाम होता. परंतु, अमित शाह यांनी मंगळवारी रात्री सह्याद्री अतिथीगृहावर घेतलेल्या बैठकींनंतर हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. अमित शाह यांच्यासोबत झालेल्या बैठकींनंतर भाजप लोकसभेच्या जास्तीत जास्त जागा लढवू शकतो, असे भाजपाच्या गोटातून सांगितले जात आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आपल्याला जागावाटपात सन्मानजनक वाटा मिळाला पाहिजे, हे अमित शाह यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. (पान ७ वर)

### ▸ माढ्याच्या जागेचा डाव उधळला

माढा लोकसभा मतदारसंघात आपल्या पक्षाची ताकद जाास्त असल्याचे सांगत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने माढा मतदारसंघावर दावा केला होता. त्या मतदारसंघात राष्ट्रवादीचे तीन आमदार आहेत. त्यामुळे हा मतदारसंघ आपल्याकडे द्यावा, अशी मागणी केली. त्यामागे माढ्यावर दावा सांगून रायगडचा तिढा सोडवायचा, असा होरा होता. मात्र सुनील तटकरे यांच्यापेक्षा निवडून येण्याची क्षमता भाजपाची जास्त आहे, असे स्पष्ट करण्यात आले. माढ्यात जिंकून येण्याची क्षमताही भाजपाची जास्त असल्याने भाजपाच उमेदवार देणर असल्याचे शहा यांनी ठासून सांगितल्याने अजित पवार गोंधळून गेले, असे या सूत्रांनी स्पष्ट केले.

### ▸ बारामती राष्ट्रवादीला देणार !

बारामती राष्ट्रवादीला देणार आहे. त्यात अजित पवार यांनी ताकद लावावी, असा भाजपाचा प्रयत्न असेल. या मतदारसंघात अजित पवार यांनी तळ ठोकला तर शरद पवार यांनाही मतदारसंघात अडकून पडावे लागेल. त्यामुळे अजित पवार यांनी बारामतीत ठेवण्याची रणनीती भाजपाने आखली असल्याची चर्चा आहे.

CMYK